

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय काव्य
दा. क्र. २०४८
BVBK-0402948

भा-वा.
२९५८
३।३।८७

# स्वामी विवेकानंद



वा. क्र. २९५८ दिनांक ३।३।८७
विषय भा.वा.

BVBK-0402948

लेखक
अरविंद पाटोळे

सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.

# अनुक्रमणिका


- शिकारीचा अविस्मरणीय क्षण .....३
- नरेंद्रचे माता-पिता ................५
- नरेंद्रचा जन्म .......................६
- नरेंद्रचे बालपण ........... .......७
- नरेंद्रची बुद्धिमत्ता ........... १०
- नरेंद्रचे गाणे .....................११
- नरेंद्र ब्राह्मो समाजात ............१२
- लग्नास नकार....................१३
- भुवनेश्वरी रामकृष्णांची प्रथम भेट .........................१४
- ब्राह्मो समाजात जाणे-येणे सुरूच..१६
- रामकृष्णांकडून शंका-निरसन.....१७
- रामकृष्णांकडून नरेंद्रची स्तुती ....१८
- नरेंद्रचा कठीण काळ..............१९
- नरेंद्रांचे विवेकानंद झाले! ........२२
- वराहनगरात साधना .............२३
- विवेकानंदांची भारत-भ्रमंती ......२४
- स्वामीजींचे परदेश-गमन..........२७
- शिकागोतील अडचणी ...........२८
- सर्वधर्म परिषदेनंतर ..............३०



*प्रकाशक ● मुद्रक :*

**प्रकाश य. कुंदूर**

**मे. श्रीराम ऑफसेट**

**क्वालिटी प्रिंटर्स आणि पब्लिशर्स**

सर्व्हे नं. १४/२३ 'गायत्री',

मु. पो. धायरी, पुणे ४१.

*प्रमुख विक्रेते :*

**मे. सरस्वती ग्रंथ भांडार**

अप्पा बळवंत चौक, पुणे २.

**मे. सरस्वती बुक डेपो**

नवी पेठ, सोलापूर ७.



*लेखक :*

**श्री. अरविंद पाटोळे**

स. नं. २३/८ हिल पॉईंट

सहकार गृहरचना संस्था,

प्लॉट नं. ११, श्रीधरनगर,

धनकवडी, पुणे ४३



आवृत्ती : १९९४



© सर्व हक्क प्रकाशकांकडे



किंमत १० रुपये

# शिकारीचा अविस्मरणीय क्षण

११ सप्टेंबर १८९३ चा तो दिवस. शिकागो शहरातील धर्म परिषदेचा हॉल श्रोत्यांनी खच्चून भरला होता. सुमारे ७/८ हजार श्रोते कानाचे धडे करून ऐकायला आलेले होते. समोर भव्य असे व्यासपीठ होते.

व्यासपीठावर जगातील सर्व धर्मांचे प्रमुख धर्मगुरू, धर्मप्रसारक, संत, महंत, आचार्य, पंडित बसले होते. मध्यभागी अध्यक्ष म्हणून ख्रिस्ती धर्मगुरू कार्डिनल गिबन्स बसले होते. ध्वनिवर्धकासमोर एक-एक प्रतिनिधी येत होते. आपापल्या धर्माचे श्रेष्ठत्व सांगत होते. पुन्हा आपल्या स्थानावर बसत होते.

शेवटी एक तरुण प्रतिनिधी उठला. त्याने पायघोळ लांब हाताचा भगवा अंगरखा परिधान केला होता. लुंगीसारखेच भगव्या रंगाचे धोतर नेसले होते. डोक्यावर भगव्या रंगाचा फेटा विलसत होता. त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता होती. डोळ्यांत आत्मविश्वासाचं तेज होतं.

धीरगंभीरवृत्तीनं पावलं टाकीत हा तरुण प्रतिनिधी समोर आला. त्याच्याआधी जगातील नावाजलेल्या, गाजलेल्या थोरा-मोठ्यांची भाषणे झाली होती. त्यामुळे त्याला क्षणभर छातीवर दडपण आल्यासारखं वाटलं. पण क्षणात निश्चयानं ते झुगारून देऊन भाषणास सुरुवात केली.



स्वामी विवेकानंदांच्या चार शब्दांनी सारी परिषद क्षणार्धात जिंकली !

"अमेरिकेतील माझ्या प्रिय भगिनींनो व बंधूंनो ! - - -"

बस्स ! एवढेच शब्द त्या प्रतिनिधीने उच्चारले मात्र, सारा हॉल टाळ्यांच्या कडकडाटाने निनादून गेला. मनातील आदर व्यक्त करण्यासाठी, मानाचा मुजरा करण्यासाठी सारा हॉल उठून उभा राहिला. या टाळ्यांच्या गजराने दोन मिनिटं त्या प्रतिनिधीला पुढचा शब्दच उच्चारता आला नाही. दोन मिनिटांनंतर सारा हॉल शांत झाला. कानात प्राण ओतून पुढचा प्रत्येक शब्दन् शब्द झेलू लागला.

थोर थोर धर्मगुरूंना मोठमोठ्या भाषणांनी जो परिणाम साधता आला नाही तो परिणाम या प्रतिनिधीने फक्त चार शब्दांतच साधला होता. सारी सभा जिंकली होती.

हा तरुण प्रतिनिधी दुसरा-तिसरा कोणी नसून भारतातून सनातन वैदिक धर्माचे प्रतिनिधी म्हणून परिषदेस उपस्थित राहिलेले स्वामी विवेकानंद हेच होते. वयाच्या केवळ तिसाव्या वर्षी त्यांनी हा पराक्रम गाजविला होता.

ही धर्म परिषद २७ सप्टेंबरपर्यंत म्हणजे १७ दिवस चालली होती. या १७ दिवसांत स्वामी विवेकानंदांनी वेगवेगळ्या धार्मिक विषयांवर १२ व्याख्याने दिली.

त्यांच्या या भाषणातून भारताचे धर्म - चैतन्य पश्चिमेकडील राष्ट्रात आपणहून प्रगट झाले होते. त्यादिवशी सारेच धर्म स्वामींच्या चरणी नतमस्तक झाले. अमेरिकेतील वर्तमानपत्रांनी धर्म-परिषदेतील 'सर्वश्रेष्ठ व्यक्ती' [illegible] केला आणि ख्रिस्ती [illegible] धर्मगुरूंना सांगितले, "विवेकानंदांसारखा धर्मप्रसारक ज्या भारतात आहे, तेथे ख्रिस्ती धर्मप्रसारक पाठविणे निव्वळ मूर्खपणा आहे."

स्वामीजींनी उच्चारलेल्या त्या चार-पाच शब्दांतच विश्वबंधुत्वाचा भाव होता. विश्वमानवतेचा नाद होता. वैदिक ऋषींची मानवाला आधार - दिलासा देणारी वाणी होती. सारी मानवजात एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, सारे स्त्री-पुरुष एका कुटुंबातील आहेत, बांधव आहेत, अखंड अशा मानव जातीचेच सारे घटक आहेत. हाच आशय त्या चार शब्दांच्या संबोधनातून प्रगटला होता.

कित्येक तास चर्चा करीत, वादविवाद करीत, भाषण करून जे सांगता आलं नसतं ते स्वामीजींच्या चार शब्दांतून स्पष्ट झालं होतं.

२७ सप्टेंबर १८८३. धर्मपरिषदेचा शेवटचा दिवस. स्वामीजींनी जगाला संदेश दिला,

"पावित्र्य, शुद्धता, दयाशीलता ह्या गोष्टी म्हणजे कोणा एका विशिष्ट संप्रदायाची, धर्माची मालमत्ता नाही. सर्व धर्मांत उदात्त चारित्र्य असलेल्या लोकांनी जन्म घेतलेला आहे. यामुळेच कोणास जर वाटत असेल, की बाकी सर्व धर्मांचा नाश होईल व फक्त माझाच धर्म टिकेल तर मला त्याची कीव येईल. मी स्पष्टपणे सांगतो की, कोणी कितीही अडथळे आणले तरी ते सर्व पार करत प्रत्येक धर्माच्या झेंड्यावर लवकरच लिहिले जाईल, "युद्ध नको एकमेकांना मदत करा. विनाश नको - आत्मसात करा. कलह नको - मैत्री व शांतता राखा."

या भाषणातून जगाला कळलं, हिंदू धर्म पददलित आहे, पण घृणास्पद नाही. तो पारमार्थिक संपत्तीचा उत्तराधिकारी आहे. धर्माच्या क्षेत्रात जगद्गुरू होण्याची त्याची योग्यता आहे. यामुळेच स्वामीजींना 'एक तुफानी हिंदू सन्याशी' विद्युत प्रभावी वक्ता अशी विशेषणे मिळाली. ❖ ❖ ❖

# नरेंद्रचे माता - पिता

स्वामी विवेकानंद यांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. त्यांच्या वडिलांचे नाव होते विश्वनाथ दत्त. ते चांगले सुशिक्षित होते. ते कायद्याचे पदवीधर होते. कलकत्याला न्यायालयात ते वकिली करीत असत. इंग्रजी भाषेवर त्यांची हुकूमत होतीच, पण त्याच-बरोबर फारशी भाषासुद्धा त्यांना चांगल्या प्रकारे येत होती. संगीताची त्यांना विलक्षण आवड होती. त्यांचा स्वभाव धीरगंभीर होता. विद्येबद्दल त्यांच्या मनात आदर व प्रेमाची भावना होती. त्यांची विचारसरणी स्वतंत्र होती तसेच तेजस्विता व उदारता ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या मनात गरीबांबद्दल कळवळा होता त्यामुळे उदार मनाने व मोकळ्या हाताने ते दानधर्म करीत असत. आपल्या अनेक गरीब नातेवाइकांना त्यांनी आधार व आश्रय दिलेला होता. त्या सर्वांचा ते सांभाळ करीत असत. त्यांना वाचनाची व कविता करण्याची आवड होती.

नरेंद्रच्या आईचे नाव होते भुवनेश्वरी. साऱ्या स्त्रीजातीमध्ये रत्नाप्रमाणे उठून दिसाव्यात अशाच त्या होत्या. त्यांचे चरित्र सुद्धा अत्यंत उदार असे होते. त्या अत्यंत हुशार, बुद्धिमान आणि कार्यकुशल होत्या. त्यांचा स्वभाव गोड असल्याने सर्वांना त्या आवडत असत. त्या भक्तिपरायण होत्या. घरातील देवदेवतांची पूजा मनापासून, श्रद्धेने आणि भक्तीने करण्यातच त्यांचा बराचसा वेळ जात असे. त्या तेजस्वी व सर्वगुण- संपन्न होत्या. त्या रामायण, महाभारत, पुराण वाचत. त्यांना लिहिता-वाचता येत होते.

भारतीय संस्कृतीत स्त्रीला शक्तीचे उगमस्थान मानण्यात आले आहे. भुवनेश्वरींनी विवेकानंदांना जन्म देऊन त्यांच्या चारित्र्याची, व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण करून हे म्हणणे खरे असल्याचे सिद्ध केले. म्हणूनच विवेकानंद म्हणाले होते, ''माझ्या ठिकाणी ज्ञानाचा विकास होण्यामागे माझ्या आईचा फार मोठा वाटा आहे. तिचा मी सदैव ऋणी आहे.''

हे दत्त कुटुंब कलकत्ता येथेच रहात होते. सिमुलिया गल्लीतील गौर मोहन मुखर्जी रस्त्यावर त्यांचे घर होते. त्या घरात कायम सणवारांचा थाटमाट चालू असे. कलकत्त्यात या घराला चांगलीच प्रतिष्ठा मिळाली होती.

विश्वनाथ दत्तांचे वडील दुर्गाचरणसुद्धा धार्मिक प्रवृत्तीचे व सुसंस्कृत होते. ते वकील होते. इंग्रजी, फारशी व संस्कृत भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

❖ ❖ ❖

बाल वाङ्मय विभाग
२९४८ दिनांक 31/3/98
विषय

# नरेंद्रचा जन्म

दत्त घराण्याची परंपरा उज्ज्वल होती, धार्मिकता व सुसंस्कृतपणा ही त्यांची वैशिष्ट्ये होती. शालीनता, नम्रता आणि लोकसंग्रहकतेनं हे घराणं उजळून निघालं होतं.

या प्रसन्न घरात राहूनही भुवनेश्वरीदेवींच्या मनात एक वेदना होती. एक खंत होती. त्यांना पुत्रप्राप्ती झाली नव्हती. यामुळे कधी कधी त्या विषण्ण, उद्विग्न होऊन जायच्या. एक चांगला सुपुत्र व्हावा म्हणून त्या शंकराजवळ मागणे मागत होत्या. रोज शंकराची पूजा झाल्याशिवाय त्या तोंडात पाण्याचा थेंबसुद्धा घेत नसत.

त्यांनी अनेक व्रतवैकल्ये केली. एका नातेवाईक स्त्रीमार्फत काशी विश्वनाथ मंदिरात पुत्रप्राप्तीसाठी होमहवन करविले.

शेवटी १२ जानेवारी १८६३ म्हणजे पौष कृष्ण सप्तमी या दिवशी सकाळीच माता भुवनेश्वरींनी एका पुत्रास जन्म दिला. जन्माचे सार्थक झाले. आपली मनोकामना पूर्ण झाली म्हणून भुवनेश्वरींना खूप खूप आनंद झाला.

नाव ठेवण्याचा दिवस उजाडला. बाळाचा तोंडवळा आजोबासारखा होता म्हणून त्याचे नाव दुर्गाचरण ठेवावे, असे अनेकांचे मत होते. पण हा भगवान शंकराचाच आशीर्वाद आहे, असा माता भुवनेश्वरींचा विश्वास होता; त्यांनीच 'वीरेश्वर' नाव ठेवण्यास सुचविले. त्याप्रमाणे बाळाचे नाव वीरेश्वरच ठेवण्यात आले. पुढे आप्त-मित्रांनी याच वीरेश्वराचे लघुरूप केले, विले. त्याच नावाने बाळाला ते हाका मारू लागले.

पण हिंदू धर्मात ठेवलेल्या नावाने मुलास हाका मारत नाहीत, तर त्यासाठी त्याचे दुसरे नाव ठेवतात. पहिले नाव राशी नाव असते, तर दुसरे व्यवहारातील नाव असते. तेच पुढे प्रचलित होते. या वीरेश्वराचे व्यावहारिक नाव होते नरेंद्र. तेच पुढे रूढ झाले.

स्वामी विवेकानंद नाव धारण करीपर्यंत हा वीरेश्वर उर्फ विले नरेंद्रनाथ याच नावाने सर्वांना परिचित होता.

दिसामासाने नरेंद्रनाथ वाढत होता. एक तेजःपुंज बालक ! त्याचे मन आकार घेत होते. पण काही वर्षांनंतर हेच बालक सारे जगच जिंकणार आहे, त्याच्या नावाचा डंका दाही दिशांत दुमदुमणार आहे, हे कोणाला माहीत होते? संन्याशी आजोबाप्रमाणे हासुद्धा विरागी होणार आहे, याची तरी कोणाला कल्पना होती?

❖ ❖ ❖

# नरेंद्रचे बालपण

नरेंद्र वाढू लागला. वयाबरोबर त्याच्या खोड्या वाढू लागल्या. खट्याळपणा वाढू लागला. तो अवखळ होऊ लागला. तो कोणालाच आणि कशालाच जुमानीत नसे. धाक दाखविला तरी भीत नसे. समजून घातली तरी पटत नसे. विनवण्या केल्या तरी मानीत नसे.

नरेंद्रला त्याच्या मताप्रमाणे कोणी वागू दिलं नाही तर तो खूप आरडाओरडा करायचा. घरातील सर्व लोक त्रासून जायचे. मग आई म्हणायची, "बघ हं विले, तू असं वागलास तर महादेव तुला कैलासमध्ये येऊच देणार नाहीत." हे ऐकताच नरेंद्र भीतियुक्त नजरेनं आईकडे पहायचा आणि लगेच शांत बसायचा.

कधी कधी विले कशानेच शांत होत नाही हे पाहिलं की आई थंड पाणी घेऊन यायची आणि 'शिव शिव' म्हणत विलेच्या डोक्यावर थंड पाण्याची धार धरायची. काय आश्चर्य घडत असे कोण जाणे, पण भयानक संतापलेला विले एकदम शांत होऊन जात असे.

कधी कधी विले आपल्या बहिणींच्या खूप खूप खोड्या करीत असे. बहिणी अगदी वैतागून त्याला धरायला धावत. तसा विले पळत पळत न्हाणीच्या सांडपाण्यात उभा राही. घाणीत गेल्याने विटाळ होईल म्हणून त्याच्या बहिणी बिचाऱ्या दातओठ खात लांबच उभ्या रहात व थोड्याच वेळाने हात चोळत परत जात. मग हसत खट्याळपणे विले म्हणे, "आता का ग ? या ना, या. धरा मला." असे म्हणत तो टाळ्या वाजवीत बसे.




आणि संतापलेला विले एकदम शांत होत असे.

लहानपणापासूनच नरेंद्रला एकांतात ध्यान लावून बसण्याची सवय होती. त्याची बुद्धी आणि स्मरणशक्ती लहान वयातही अत्यंत तीव्र होती. मुग्धबोध व्याकरणातील सूत्रे ऐकून ऐकूनच या वयात त्याची पाठ झालेली होती.

आई भुवनेश्वरी पुराण व इतिहासातील श्रेष्ठ महापुरुषांच्या गोष्टी त्याला सांगे. यावेळी मात्र खोडकर, खट्याळ विले अगदी गोगलगाईसारखा गुपचूप बसून, कान देऊन त्या कथा ऐकत असे.

लहान वयातच त्याची बुद्धी मेधावी होती. स्वभाव निर्भीड होता. वृत्ती साहसी होती. तो मित्रप्रिय होता. एकदा ऐकलेली गोष्ट त्याच्या कायमची लक्षात रहात असे. रामभक्त हनुमान हा नरेंद्राचा आदर्श होता.

एकदा नरेंद्र आपल्या मित्रांसह ध्यानस्थ बसला होता. इतक्यात तेथे एक नाग आला. बाकीची मुलं नाग पाहून घाबरली. आरडाओरडा करत पळाली. पण नरेंद्रने ध्यान सोडले नाही. त्याची समाधी भंगली नाही. तो तसाच




लहानपणापासून नरेंद्रला एकांतात ध्यान लावून बसण्याची सवय होती.

निश्चयीपणे बसून राहिला. थोड्या वेळाने नागाने आपली फडा आवरला व तो गुपचूप निघून गेला.

सहाव्या वर्षी वडिलांनी त्याचे शाळेत नाव घातले. पण अन्य मुलांच्या सोबतीनं तो बिघडला. वाईटसाईट बोलू लागला. मग वडिलांनी त्याला शाळेतून काढले आणि घरीच शिक्षक ठेवून शिकविण्यास सुरुवात केली.

सातव्या वर्षी त्याला पुन्हा ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्यूटमध्ये इंग्रजी शिकण्यास घातले. पण प्रथम त्याने इंग्रजी शिकण्यासच नकार दिला. तो म्हणे, "आपल्याच भाषा आपण शिकायला पाहिजे. परकी भाषा इंग्रजी आम्ही का बरे शिकावी?" पण नंतर त्याचा विचार बदलला व इंग्रजी शिकण्यास त्याने सुरुवात केली.

लहान वयात तो खूप निर्भय होता. भूत, पिशाच, ब्रह्मराक्षस यांपैकी कशालाच घाबरत नसे. कुणी सांगितलं म्हणून तो ऐकत नसे. मान्य करीत नसे. पुराव्याशिवाय त्याचा कशावरच विश्वास बसत नसे.

शाळेत शिकविलेला भाग तो पटकन आत्मसात करी. सांगितलेला अभ्यास झटकन आटोपून टाके. मग सारा वेळ दंगा-मस्ती, खेळ, व्यायाम, पोहणे, नाटके पहाणे यांतच घालवीत असे.

त्याच्या ब्रह्मचारी पोचमनच्या सांगण्यामुळे त्याचे मन लग्नाविरोधी तयार झाले. मग सीता-रामाची पूजा करण्यास तो तयार होईना. शेवटी एक दिवस सगळ्यांचा डोळा चुकवून त्याचे घरातील सीता-रामाची मूर्ती रस्त्यावर फेकून दिली.

रूढींचे पालन करतानाही तो अनेक प्रश्न विचारत असे. मग समाधानकारक उत्तर मिळाले तर तो त्या पाळत असे. नाहीतर त्या रूढी पाळण्यात, मोडण्यात, त्यांच्या विरोधी वागण्यास त्याला खूप खूप जोर चढत असे.

वडिलांच्या मुसलमान अशिलाशी नरेंद्रची मैत्री जमली व मग त्याच्या हातची मिठाई, फळे खाण्यास तो घाबरत नसे. एकदा अशिलांसाठी ठेवलेले दिवाण खान्यातील सर्वच हुक्के एक-एक करून त्याने ओढले. वडिलांनी विचारताच तो म्हणाला, "जात-पात मानली नाही तर मला काय होते ते पाहत होतो." पण त्याचे वडील धर्मवेडे हिंदू नव्हते. सर्व जातींच्या लोकांबद्दल त्यांच्या मनात प्रेम आणि श्रद्धेची भावना होती.

लहानपणापासूनच त्याला सेवेची आवड होती. कष्टकऱ्यांबद्दल सहानुभूती होती. दुःखितांबद्दल त्याच्या मनात कळवळा होता. साधू-बैरागी, संन्याशी पहाताच त्याची कळी खुलून जायची. त्यांना खूष करण्याचा तो प्रयत्न करायचा. ते मागतील ती घरातील वस्तू त्यांना देऊन टाकायचा. अंगावरचे कपडे, अगदी नेसलेले धोतरही फेडून तो स्वतः नग्न होई व ते मागणारास देऊन टाकी. कधी कधी धोतर फाडून लंगोटी लावायचा व आपल्या अंगणात 'शिव शिव' म्हणत तल्लीन होऊन नाचत रहायचा. अंगाला भस्म लावायचा. ते साजरे-गोजरे, लोभस नाचणारे रूप पाहून आईचा राग मात्र कुठल्या कुठल्या पळून जायचा.

रामायण-महाभारतातील बराचसा भाग ऐकूनच त्याने पाठ करून टाकला होता. तो भाग म्हणून दाखवित असे. दारावर येणाऱ्या भिकाऱ्यांपासून सीता-राम, राधा-कृष्ण

यांच्यासंबंधीची गाणी ऐके. पाठ करी व ती परत घरातील मंडळींना, वडिलांच्या मित्रांना म्हणून दाखवून त्या सर्वांचे मनोरंजन करी.

पुराणातील कथा ऐकून त्याला प्रचंड आध्यात्मिक शक्ती प्राप्त झाली. इहलौकिक व पारलौकिक ज्ञान प्राप्त झाले. ज्ञान, दया, करुणा, परदुःख, कातरता, समभाव, मैत्री, तेज, आत्मविश्वास, स्वातंत्र्य, प्रेम, शौर्य, वीर्य, धैर्य, स्थैर्य इ. गुण प्राप्त झाले. नेतृत्वाचा गुणसुद्धा त्याच्यात वाढीस लागला.

भारतातील उपेक्षितांच्या उद्धाराचा संकल्प त्याने केला व शेवटपर्यंत तो पाळला. लहानपणच्या छोट्यामोठ्या घटना - प्रसंगांतून त्याचा पिंड पोसला. विचार तयार झाले. आत्म्याची जडणघडण झाली. याचा परिणाम म्हणूनच पुढे नरेंद्रचे रूपांतर विश्वविजयी स्वामी विवेकानंदांमध्ये झाले.

जसजसे वय वाढत होते तसतसे एका बाजूने व्यायाम, घोडदौड, पोहणे यांतून शरीरसौष्ठव प्राप्त केले, तर दुसऱ्या बाजूने धर्म, तत्त्वज्ञान, संगीत, वाद्यसंगीत यांमध्ये प्रावीण्य प्राप्त केले. याचबरोबर चिंतन-शीलता, ध्यानपरायणता, अध्ययनशीलता, मनाचे पावित्र्य हे गुणही त्यांच्यात विकसित झाले,

स्वामी विवेकानंद नेहमी म्हणत. ''वन प्रदेशातून प्रवास करीत असताना त्या दिवसांत मी जे पाहिले आणि अनुभवले, ते माझ्या स्मृतिपटलावर कायमचेच कोरले गेले आहे.

❖ ❖ ❖

## नरेंद्रची बुद्धिमत्ता

ते १८७७ साल होते. विश्वनाथ दत्त म्हणजे नरेंद्रचे वडील रायपूरला गेले होते. नरेंद्र त्यांच्याबरोबर गेला. त्या काळात रेल्वे, मोटार ही वहाने प्रचलित नव्हती. त्यांना बैलगाडीतूनच जावे लागले. या रायपूरला शाळा नव्हती. मग काय ! केवळ रानावनात फिरण्यातच त्यांचा सगळा वेळ जायचा. त्याने सृष्टिसौंदर्य पाहिले. निसर्गाचा अभ्यास केला.

त्याने उंच उंच विंध्याद्रीची शिखरे पाहिली, फळाफुलांनी लगडलेल्या वृक्ष-वेलींशी लगट केली. किलबिलाट करणाऱ्या रंगीबेरंगी पक्ष्यांशी मैत्री केली. सुगंधाने भारलेल्या मधुर-गंभीर वातावरणाचा आस्वाद घेतला.

रायपूरला शाळा नसल्याने विश्वनाथ दत्त स्वतःच सवडीच्या वेळेत नरेंद्रला शिकवीत असत. शालेय पुस्तकांबरोबरच ते इतिहास, तत्त्वज्ञान, साहित्यविषयक पुस्तके शिकवू लागले. त्यांचा घरी विद्वान मंडळींच्या बैठका होत. चर्चा, वादविवाद होत असत. नरेंद्र तेथे थांबे, लक्षपूर्वक ऐके. हळूहळू तोसुद्धा या चर्चेत भाग घेऊ लागला. हळूहळू वडीलसुद्धा त्याला प्रोत्साहन देण्यासाठी त्याच्याशी वादविवाद करू लागले.

त्याने आठव्या वर्षी संपूर्ण अमरकोष तोंडपाठ केला होता. तसेच प्रवेश परीक्षेस बसण्यापूर्वी त्याने भारतीय इतिहासावरील बहुतेक सगळी पुस्तके वाचली होती. प्रसिद्ध लेखकांची इतर विषयांवरील विविध पुस्तके

वाचून आपले ज्ञान भांडार त्याने समृद्ध केले होते. फक्त एका दिवसात त्याने भूमितीच्या चारही भागांचा अभ्यास पूर्ण केला होता.

एकदा मेट्रोपोलिटन इन्स्टिट्यूटमधील एका शिक्षकांचा निरोप-समारंभ होता. सुरेंद्रनाथ बॅनर्जी अध्यक्ष होते. त्यांच्यासमोर भाषण करण्याची कोणाची हिंमत होईना. मग सर्वांच्या आग्रहावरून नरेंद्रने अस्खलित इंग्रजीत अर्धा तास भाषण केले. बॅनर्जींनी त्याचे कौतुक केले. तो पुढे असामान्य वक्ता होईल, असे भविष्य वर्तविले. पुढील काळात हे भविष्य कसे तंतोतंत खरे ठरले हे आपणास माहीत आहेच.

❖ ❖ ❖

## नरेंद्रचे गाणे

विश्वनाथ दत्त यांनी आपल्या विलक्षण प्रतिभेच्या मुलाला संगीताचे धडे आपल्या घरीच दिले. त्यासाठी त्यांनी घरीच एका संगीतशिक्षकाची नेमणूक केली. त्या शिक्षकाने नरेंद्रला शास्त्रीय संगीताचे धडे दिले. नरेंद्रला नृत्याचेही ज्ञान होते. पाश्चिमात्य देशांत



नरेंद्रच्या गाण्याने रामकृष्ण परमहंसांना मंत्रमुग्ध केले.

गेल्यावर तेथील संगीतसुद्धा नरेंद्रने आत्मसात केले. तबला, पखवाज, मृदंग, सतार, दिलरूबा या वाद्यांच्या वादनकलेतसुद्धा त्याने प्रावीण्य संपादन केले होते.

शाळेत असताना एकदा त्याच्या वर्गातल्या मित्रांनी त्याला गाण्याचा आग्रह केला. त्याने एक भजन म्हणण्यास सुरुवात केली. तो तल्लीन होऊन गाऊ लागला. इतक्यात वर्गात प्राध्यापक आले. प्रथम वर्गात कोणी विद्यार्थी गातो आहे, हे ऐकून ते फारच रागावले. पण नरेंद्रची ती गानसमाधी पाहिली, आवाजातील तो गोडवा ऐकला आणि ते मंत्रमुग्ध होऊन गेले. भारून गेल्यासारखे सम्मोहित अवस्थेत ते गाण्यात अगदी गुंग होऊन गेले. त्यांचा रागतर कधीच नाहीसा झाला होता.

एकदा नरेंद्राच्या घराशेजारीच रहाणाऱ्या एका मित्राच्या घरी रामकृष्ण परमहंस येणार होते. ज्यांच्या घरी रामकृष्ण येणार होते त्यांचं नाव सुरेंद्रनाथ ठाकूर होते. रामकृष्णांना भजनांची आवड होती. भजने ऐकताना त्याची [illegible] ते ठाकुरांना ठाऊक होते. त्यांना चांगला गायक मिळाला नाही. मग गोड गळ्याने, सुरेल आवाजात भजने गाणाऱ्या नरेंद्रालाच त्यांनी गाण्यासाठी बोलावले.

हीच रामकृष्ण व नरेंद्राची पहिली भेट. रामकृष्णाच्या मनात नरेंद्रचे गाणे व स्वतः नरेंद्रही पूर्णपणे भरला. यावेळी नरेंद्र १८ वर्षांचा असावा आणि हा प्रसंग नोव्हेंबर १८८१ मधला. हेमंत ऋतूचा शेवट होता. नरेंद्र यावेळी एफ. ए. च्या परीक्षेची तयारी करीत होता.

रामकृष्णांनी नरेंद्रला जवळ बोलावून घेतले. त्याची सर्व चौकशी केली. नरेंद्रच्या शरीरावरील खाणाखुणा पाहिल्या. त्याचे बारकाईने निरीक्षण केले. त्यांनी मनातून नरेंद्रची दिव्यशक्ती जाणली. पृथ्वीतलावर त्याने जन्म घेण्याचा हेतू त्यांना उमगला. आपले ईप्सित साध्य करणारी व्यक्ती नरेंद्रच्या रूपाने त्यांना सापडली होती. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाचे, समाधानाचे, तृप्तीचे अश्रू घळाघळा वाहू लागले. नरेंद्राशी या गोष्टी बोलून रामकृष्णांनी त्याला भुवनेश्वरी येण्याचे प्रेमाचे, आग्रहाचे निमंत्रण दिले.

❖ ❖ ❖

## नरेंद्र ब्राह्मो समाजात

नरेंद्र अठरा वर्षांचे झाले. एफ. ए. ची परीक्षा देणार होते. या काळात त्यांनी पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. दोन्ही तत्त्वज्ञानांची एकमेकांशी तुलना केली. संदेहवाद व नास्तिकवाद यांचा परिचय करून घेतला.

ते स्वतः सगुण ब्रह्माचे उपासक होते. मूर्तीपूजा त्यांना मान्य नव्हती. "मूर्तीत देव नाही. जाती नाहीशा केल्या पाहिजेत. स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे." हे विचार जेव्हा त्यांनी ऐकले तेव्हा त्यांच्या मनाचा गोंधळ उडाला. देव

खरेच आहे का ? असल्यास त्याची भेट कोठे होऊ शकेल ? ही भेट कोण घडवून आणू शकेल ? अशा नियमांनी त्यांचे मन अस्वस्थ झाले.

सत्यशोधनाच्या अत्यंत तीव्र अशा आंतरिक प्रेरणेने प्रेरित होऊन नरेंद्रनाथांनी ब्राह्मो समाजात प्रवेश केला होता. नरेंद्र तर्कनिष्ठ होता, संदेहवादी होता. सत्यान्वेषणी होता. तो ब्राह्मो समाजातील आचार्यांचा उपदेश आदराने व मन लावून ऐकत असे. काही दिवसांनी ते ब्राह्मो समजाचे सदस्य झाले.

ते सभासद झाले, पण काही ठराविक नमुन्यांची सरधोपट मते, विशिष्ट पद्धतींची उपासना यामुळे या लोकविलक्षण तरुणाची अद्‌भुत व अतिउत्कट आध्यात्मिक तहान मुळीच भागू शकली नाही.

ब्राह्मो समाजात सभासद होण्याआधी-पासून नरेंद्रने राजा राममोहन राय यांचे पुस्तक व प्रबंधरूपाने प्रकाशित झालेले साहित्य वाचले होते. ते इथे सभासद असले तरीही देवेन्द्रनाथ व केशव बाबू यांच्याकडे तात्त्विक चर्चेसाठी नेहमी जात असत.

ते ब्राह्मोसमाजात जात होते, पण पूर्व संस्काराने घडलेले त्यांचे मन त्यांना सांगत असे, "जर परमेश्वर खरोखरच असेल तर, मानवाच्या अतिशय व्याकुळ झालेल्या ह्रदयाच्या आळवणीपुढे तो आपले स्वरूप लपवून ठेवू शकणार नाही. त्याला प्राप्त करून घेण्याचा मार्ग त्याने नक्कीच तयार करून ठेवला असणार, त्याची प्राप्ती करून घेण्याशिवाय इतर उद्देशांनी जिवंत रहाणे केवळ विटंबना होय.

उपासनेच्या बाबत नरेंद्राचे ब्राह्मो समाजातील इतर अन्य सभासदांशी एकमत होऊ शकले नाहीत; ते कठोर टीका करत पण तरीदेखील तेथील नेते नरेंद्रावर आपली मर्जी बहाल करीत. ब्राह्मो समाजाच्या जाज्वल्य धार्मिकतेअभावी समाजाच्या साचेबंद उपासनेने जात्याच वैराग्यप्रवण असलेले त्यांचे मन कधीच संतुष्ट होऊ शकले नाही.

❖ ❖ ❖

## लग्नास नकार

नरेंद्राने एफ. ए. ची. परीक्षा दिली. याचबरोबर एका कठीण प्रसंगाला तोंड देण्याची वेळ नरेंद्रवर आली. कलकत्त्यातील एक प्रसिद्ध व्यापारी होता. त्याची एक सावळ्या रंगाची मुलगी होती. तिच्याशी लग्न करण्यासाठी वडील सारखे मागे लागले होते. हे लग्न जमविण्यासाठी तो व्यापारी दहा हजार रुपये हुंडा देणार होता.

रामचंद्र दत्त हे नरेंद्राचे नातेवाईक होते. नरेंद्रच्या वडिलांच्या सांगण्यावरून त्यांनी नरेंद्रला लग्नास राजी करण्याचा खूप खूप प्रयत्न केला. रामचंद्र दत्त हे त्यांच्याच कुटुंबात वाढले होते. शिकून ते डॉक्टरही झालेले होते.

नरेंद्राला लग्नाची ओढ नव्हतीच. त्याने हा बेत पार उधळून लावला. विश्वनाथ दत्तही मुलाच्या मनाविरुद्ध काहीच करू इच्छित नव्हते. नरेंद्रानेही आपल्या मनातील संघर्ष रामचंद्र दत्त यांना सांगितला. रामचंद्र दत्त हे रामकृष्णांचे भक्त होते.

नरेंद्रच्या मनात निर्माण झालेल्या वैराग्य भावनेतून, त्याच्या मनातील धार्मिकतेमधून त्याच्या भजनपूजनात स्वतःला झोकून देण्यामुळेच तो लग्न करत नाही, हे रामचंद्र दत्तांच्या जेव्हा लक्षात आले तेव्हा ते नरेंद्रास म्हणाले, "अरे बाबा, सत्याचा, धर्माचा लाभ करून घेणे हेच जर तुझ्या मनात असेल तर मग, तू इकडे तिकडे न भटकता, ब्राह्मोसमाजाच्या नादी न लागता सरळ दाक्षिणिश्वरी जाऊन रामकृष्ण परमहंसांची भेट घे."

नरेंद्रला त्यांचे म्हणणे पटले. मग एक दिवस त्यांचे शेजारी सुरेंद्रनाथ यांनी नरेंद्रला दक्षिणेश्वरी आपल्या गाडीमधून चलण्या विषयी सांगितले. नरेंद्रने मग आपले चार-दोन मित्र बरोबर घेतले व सुरेंद्रनाथांच्या गाडीतून दक्षिणेश्वरी गेले.

अशा तऱ्हेने त्यांच्या मनात असलेल्या धर्मभावनेमुळे आपल्या सर्वस्वाचा त्याग करून त्यांनी अगदी ठामपणे लग्नाला विरोध करून ब्रह्मचर्यव्रताचे पालन करण्याचा निश्चय केला व शेवटपर्यंत तो अगदी तंतोतंत पाळला.

❖ ❖ ❖

## भुवनेश्वरी रामकृष्णांची प्रथम भेट

तो १८८१ सालचा डिसेंबर महिना होता. नरेंद्रनाथ आपल्या मित्रांसह भुवनेश्वरीला रामकृष्णांना भेटायला आला होता. मित्रांसह तो पश्चिमेकडच्या गंगनदीच्या बाजूस असलेल्या दरवाजाने आत शिरला.

आत प्रवेशातच नरेंद्राने ठाकूरांना - रामकृष्णांना पाहिलं. त्यांचं स्वतःच्या शरीराकडे लक्ष नाही, डोक्याचे केस व कपडे यांची फिकिर नाही, कोणत्याही बाह्य गोष्टींबद्दल आग्रह नाही. ओठापर्यंत न आलेल्या बऱ्याच गोष्टी मनात दडून आहेत, हे त्यांच्या डोळ्यांकडे पाहून वाटत होतं.

रामकृष्णांनी नरेंद्रला पाहिलं. पहिल्या दृष्टभेटीतच त्यांचा आनंद ओसंडून वाहू लागला. शेजारी जमिनीवर चटई अंथरली होती. तिथं नरेंद्रला बसायला सांगितलं. गंगाजळाच्या घड्याजवळच तो बसला. त्याच्याशेजारी बरोबरची मित्र-मंडळी बसली, पण त्यांच्याकडे पहाताच वाटले की, त्यांचा स्वभाव नरेंद्रच्या नेमका उलट आहे. त्यांची दृष्टी विषयासक्त आहे. त्यांची वृत्ती भोगवादी आहे.

पण रामकृष्ण नरेंद्रला पहाताच त्याच्याशी असे बोलू लागले की, जणू त्या दोघांची खूप जुनी-पुराणी अगदी घनिष्ठ ओळख आहे. विचारपूस चौकशी झाली. नरेंद्राने व्याकुळ होऊन, तल्लिनतेने सुरेल आवाजात गायलेले भजन त्यांच्या मनात ठसले होते. आतासुद्धा त्यांनी नरेंद्रला भजन म्हणण्याचा आग्रह केला.

नरेंद्र फक्त दोन-चारच बंगाली गीतं शिकला होता; त्यांपैकी 'मन चलो निज निकेतने।।

संसार विदेशे, विदेशीर वेशे भ्रमो कहो आकारणे ॥'

हे पद मनाशी निवडून, प्राण ओतून, तल्लीन, ध्यानमग्न होऊन म्हटले. त्या सुरेल, मधुर आवाजाने सारी खोली भरून गेली. सारं

वातावरण भारलं गेलं. श्रीरामकृष्ण स्वतःला सावरू शकले नाहीत. केवळ 'अहाहा !' एवढे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघाले. त्या भावप्रवाहात अगदी सहजपणे ते कधी बुडाले ते कळलंच नाही. त्यांच्या डोळ्यांतून पाणी वहात होतं आणि ते समाधी अवस्थेत गेले होते.

थोड्या वेळानंतर सहजावस्थेत ते आले. अगदी भावतन्मयतेने नरेंद्रचा हात हातात धरून त्याला ते एकांतात घेऊन गेले. ती घराच्या उत्तरेकडील पडवी होती. हिवाळ्यात बोचरा, झोंबणारा गार वारा लागू नये म्हणून चटईचे पडदे लावलेले होते. तिथं प्रवेश करताच त्यांनी पडवीचा दरवाजा लावून घेतला. त्यांनी अतिशय प्रेमाने नरेंद्रचा हात धरला होता. अतिशय आनंदाने त्यांच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले होते. अगदी प्रेमपूर्ण आणि गदगद स्वरात ते म्हणाले, ''इतका कसा तू विसरलास रे ? मला तुझ्या भेटीची किती आतुरता होती. आज येशील, उद्या येशील म्हणून मी तुझ्या रस्त्याकडे डोळे लावून चातकासारखी वाट पहात होतो. इतक्या दिवसांनी यायचे असते का रे ? या जगातील विषयी, भोगी लोकांशी बोलून बोलून माझे तोंड होरपळून गेले आहे. त्यांच्या भोगासक्त विषयलोलुप गोष्टी ऐकून ऐकून माझे कान फुटून गेले आहेत. माझ्या मनात भावनांचा सागर ओथंबला आहे. त्या भावना मनात साठून साठून माझी छाती फुटायला आली आहे. तुझ्यासारख्या विरागी, खऱ्याखुऱ्या माणसाशी बोलावं, आपलं मन मोकळं करावं, अशी तळमळ लागून राहिली होती. आज मनाच्या समुद्राला भरती आली आहे. तुला बोलून माझा आत्मा तृप्त होणार."

बोलता बोलता त्याचा गळा दाटून आला. डोळे पाण्यानं डबडबून गेले. क्षणार्धात ते समाधी अवस्थेत गेले.

त्यांचं हे असं वागण, बोलणं पाहून नरेंद्र थक्कच होऊन गेला. तो अवाक् होऊन संमोहित झाल्यासारखा नुसता पहातच राहिला इतक्यात रामकृष्णांनी दोन्ही हात जोडले आणि म्हणाले. ''प्रभू, मला माहीत आहे, त्या थोर सप्तर्षी मंडळांतीलच आपण एक थोर ऋषि आहात. हा नरदेह धारण करून आपण पृथ्वीवर अवतरला आहात. त्या भूतलावर असलेल्या जीवांना दुर्गतीपासून वाचविण्यासाठी, त्यांचे कल्याण करण्या साठीच आपण हा जन्म घेतले आहे.''

मग त्यांनी आत जाऊन खाण्याच्या का वस्तू आणि लोणी आणलं. पलंगावर बस आपल्या हातांनी नरेंद्रला ते भरवू लागले. म्हणाला, ''हे माझ्याकडे द्या, मी मित्रां खातो.'' ते म्हणाले, ''नको, आधी तू हे मित्र नंतर खातील.'' अशा तऱ्हेने सर्व अगदी स्वतःच्या हाताने आग्रह करकरून त्या नरेंद्रला भरविले.

नरेंद्रला वाटले, बहुतेक ते अर्धवट असावेत. माझ्यासारख्या एवढ्याशा सा पोराला त्यांनी असं का बोलावं ? खाऊ झाल्यावर त्यांनी पुन्हा नरेंद्रचा हात म्हणाले, ''तू पुन्हा अगदी लौकरच भेटण्यासाठी एकटा येशील असं वचन दे.'

इतका प्रेमळ, कळकळीचा आग्रह डावलू शकला नाही. त्यानं रामकृष्णांन वचन दिलं आणि बाहेर येऊन मित्रांच्या बसला.

❖ ❖

# ब्राह्मो समाजात जाणे-येणे सुरूच

अतिशय पुढे मनोबल असलेल्या नरेंद्रांचे मन रामकृष्णांनी मातीच्या ओल्या गोळ्याप्रमाणे बनवलं होतं. यामुळं रामकृष्णांच्या ठायी अनन्यसाधारण शक्ती आहे. असं नरेंद्रला वाटू लागलं. त्यांचा मनावरील प्रभाव दूर करणं त्याला अशक्य झालं. पण तरीही कुठलीही गोष्ट पारखून घेतल्याशिवाय त्याचं मन मान्य करायला तयार नव्हतं. कशानेही भारावून जायचे नाही, असा त्यांचा दृढ निश्चय होता.

म्हणूनच रामकृष्णांविषयी ओढ वाटू लागली. दक्षिणेश्वरी येणे-जाणे चालू झाले तरी त्यांनी ब्राह्मोसमाजाशी संबंध तोडला नव्हता. तेथेही त्यांचे जाणे-येणे सुरूच होते. कारण आदि ब्राह्मोसमाजाचे 'वंदनीय आचार्य महर्षि देवेंद्रनाथ यांनी त्यांना ईश्वराचे ध्यान करण्याचा सराव सांगितले होते. तसेच ते म्हणाले होते, तुमच्यामध्ये योग्याची लक्षणे आहेत. तुम्ही ध्यानधारणेचा अभ्यास केला तर योगशास्त्रात सांगितलेली सर्व फळे लौकरच अनुभवाल.

महर्षींच्या पवित्र चारित्र्यावर नरेंद्राची श्रद्धा असल्याने त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागण्यास त्याने सुरुवात केली होती. म्हणूनच दक्षिणेश्वरी जरी येणे-जाणे सुरू झाले तरी ब्राह्मो समाजाच्या नियमित उपासनेत त्याने कधीही खंड पडू दिला नाही.

निराकाराचे ध्यान नरेंद्राला आवडत असे. रामकृष्णांनाही ते माहीत होते; म्हणूनच बळजबरीने साकारावर विश्वास ठेवण्यास ते कधीही चुकूनसुद्धा नरेंद्राला सांगत नसत. इतकेच काय नरेंद्राच्या ब्राह्मो समाजात जाण्याससुद्धा त्यांनी कधी हरकत घेतली नाही. कारण ते कुणाच्याही धर्माचरणाच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करत नसत. श्रीरामकृष्णांना आंतरदृष्टी प्राप्त झाली होती त्यामुळे कोणाकडेही बघता क्षणीच ते त्याच्या मनात काय आहे ते जाणू शकत होते. मग त्याप्रमाणे प्रत्येकाच्या भावनेनुसार त्याला विशिष्ट साधनपद्धती स्वीकारण्यास सांगत असत. जबरदस्तीने कोणाच्याही मनातला भाव नष्ट करता येत नाही, हे त्यांना पक्के ठाऊक होते.

तारुण्यात पाऊल ठेवल्यावर व इंग्रजी शिक्षणाने नरेंद्राची सत्यनिष्ठा खूप वाढली होती. ते म्हणतात, "आपल्याकडून खोटे बोलणे होईल म्हणून मी मुलांना कधीच बागूलबुवाची भीती दाखवीत नसे व घरी तसे कोणी करीत असले तर मी त्याची खरडपट्टी काढीत असे." अशा तऱ्हेने त्यांच्यात विज्ञाननिष्ठा-सत्यनिष्ठा ब्राह्मो समाजाच्या उपासनेने दृढमूल झाली होती.

❖ ❖ ❖

## रामकृष्णांकडून शंका-निरसन (ब्राह्मो समाजास रामराम !)

ब्राह्मो समाजाने सुधारणावादी दृष्टिकोन स्वीकारलेला होता. पण त्यांनी आपली सर्व शक्ती 'मोडतोडीवरच' खर्च केली. नवीन काही घडविण्यासाठी त्यांच्याकडे शक्तीच उरली नाही. मग या ब्राह्मोसमाजाचे तीन तुकडे झाले.

नरेंद्राच्या मनात ब्राह्मोसमाजाबद्दल श्रद्धा होती हे जरी खरे असले तरी त्यांच्या सुधारणावादी युगाबद्दल त्यांच्या मनात कधीच आदरबुद्धी निर्माण झाली नाही. ते विध्वंसाच्या विरोधातच होते. विधायक कार्य करणे हेच त्यांचे ब्रीद होते. नरेंद्रांच्या ध्येयात व कार्य पद्धतीत समाजामधील घाण दूर करण्याच्या योजनेचा समावेश होताच. तरी त्यांनी या ब्राह्मो समाजाच्या सुधारणा युगाचा तीव्र प्रकारे निषेध केला. प्रतिकार केला. प्रतिकार करताना ते खूपच जागरूक होते.

नरेंद्र रामकृष्णांच्या सहवासात आले तरी कोणतीही गोष्ट पारखल्याशिवाय स्वीकारण्यास त्यांचे मन तयार होत नव्हते. त्यांना माहीत होते की, आपल्या शक्तीसाठी महापुरुषाच्या सहवासात आल्यावर माणसे त्याच्या सर्वच गोष्टींवर विश्वास ठेवून बसतात. ह्या गोष्टीपासून आपण आपल्या स्वतःला सांभाळले पाहिजे. स्वतः अनुभव किंवा प्रचीती घेतल्याशिवाय त्यांचे काही स्विकारायचे नाही, असा त्यांनी निश्चय केला. ते मग रामकृष्णांच्या अद्‌भुत दर्शनाची, वर्तणुकीची कठोर पारख करण्यास सदैव जागरूक राहू लागले.

अर्थात् नरेंद्रच्या मनात घर करून असलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांना ब्राह्मो समाजात सापडले नाही. ते प्रश्न म्हणजे देव खरेच आहे का? असला तर तो कोठे भेटेल? त्याची भेट कोण घालून देऊ शकेल? यापूर्वी नरेंद्राचे नातलग ब्राह्मोसमाजाचे आचार्य देवेंद्र यांच्याकडून नरेंद्रांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नव्हते. त्याचवेळी कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. हेस्टी यांनीही या प्रश्नाच्या मार्गदर्शनासंबंधी रामकृष्णांकडे जाण्याचा सल्ला दिला.

आजपर्यंत त्याच्या प्रश्नांचे उत्तर देणारा कोणीच भेटला नव्हता म्हणूनच त्याने एक दिवस खोलीतील धर्म व तत्त्वज्ञानासंबंधीची सर्व पुस्तके खिडकीतून बाहेर फेकून दिली व रामकृष्णांकडे आला.

तेथें त्यांच्या समोर बसून धडधडत्या अंतःकरणाने त्याने रामकृष्णांना प्रश्न केला, "महाराज, आपल्याला ईश्वराचे दर्शन खरोखर झाले आहे काय ?

रामकृष्ण म्हणाले, "होय. मी देव पाहिला आहे. तुला जे मी पहातो आहे तसाच नव्हे त्यापेक्षा जास्त स्पष्टपणे पाहिला आहे. त्याच्याशी बोललो आहे.'

"मग मला तो भेटेल ?" नरेंद्राने दुसरा प्रश्न केला.

रामकृष्ण म्हणाले, "होय. अगदी सहज भेटेल. तुझ्याशी बोललेसुद्धा. फक्त मी सांगेन तसं करायला हवं."

रामकृष्णांचं उत्तर ऐकून नरेंद्रला खूप खूप आनंद झाला. तहानेने व्याकुळ झालेल्याला एकदम गोड, थंड, मधुर पाण्याचा जिवंत झरा सापडावा तसे झाले. त्याच्या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देणारी रामकृष्ण ही पहिलीच व्यक्ती होती. इतके दिवस आपण उगीचंच मृगजळाच्या

मागे धावत होतो. असे त्याला वाटले. मग त्याने ब्राह्मो समाजाला कायमचा रामराम ठोकला.

नरेंद्राने ब्राह्मो समाज सोडण्यासारखी एक घटना घडली. जिने त्यांच्या हृदयावर, मनावर फार खोलवर, मोठा आघात केला, न भरून येणारी जखम केली.

बऱ्याच दिवसांत नरेंद्रनाथ दक्षिणेश्वरी गेले नाहीत. साऱ्या भेटीसाठी व्याकुळ झालेले रामकृष्ण रविवारी नरेंद्र ब्राह्मोसमाजात नक्की भेटेल अशी अटकळ बांधून तेथे गेले. त्यावेळी आचार्य उपदेश करीत होते. रामकृष्ण सरळ वेदीजवळच गेले. रामकृष्ण तेथे येणार हे जाणून नरेंद्रही तेथे आला.

नरेंद्रने पाहिले, एवढा मोठा माणूस तेथे आला; पण त्यांचे स्वागतही कोणी केले नाही. आचार्य वेदीवरून उठलेही नाहीत. कोणी त्याच्याशी एक शब्दही बोलले नाहीत. शिष्टाचाराचे साधे संकेतही पाळले नाहीत.

उलट पुष्कळांच्या चेहऱ्यावर त्यांचा द्वेष दिसून आला. नापसंती, तिटकारा दिसून आला. पुष्कळांनी त्यांचा तिटकारा केला. हे पाहून नरेंद्र तर थक्कच होऊन गेला. या ब्राह्मबांधवांच्या वागण्याला काय म्हणावे हेच त्याला कळेना. इतक्यात रामकृष्ण समाधीत लीन झाले. त्यांना पहाण्यासाठी लोक उतावीळ झाले. गडबड करू लागले. लगेच संयोजकांनी गॅसच्या बत्त्याच विझवून टाकल्या. नरेंद्राने रामकृष्णांना मागच्या दाराने बाहेर काढले.

पण ब्राह्मो समाजाच्या सभासदांनी रामकृष्णांशी केलेले वर्तन, त्यांचा केलेला अपमान यांनी व्यथित होऊन नरेंद्राने ब्राह्मो समाजास कायमचा रामराम ठोकला.

❖ ❖ ❖

## रामकृष्णांकडून नरेंद्रची स्तुती

एक दिवस नरेंद्रनाथ इतर भक्तांसोबत रामकृष्णांच्या समोर बसले होते. या खोलीत बसलेल्या भक्तांमध्ये केशव चंद्रसेन, विजयकृष्ण गोस्वामी यांसारखे मोठ्ठी प्रतिष्ठा प्राप्त झालेले नेते बसले होते.

बराच वेळ ईश्वराबद्दल चर्चा चालली होती. बोलण्याच्या ओघात रामकृष्णांनी एकदा स्वतःकडे पाहिले, नंतर नरेंद्राकडे पाहिले आणि अन्य भक्तजनांना उद्देशून ते म्हणाले, ''माझ्या आत जो आहे तो म्हणजे शक्ती, आणि नरेंद्राच्या आत जो आहे, तो म्हणजे पुरुष. नरेंद्र माझे सासर.'' त्यांचे हे बोलणे ऐकून नरेंद्र फक्त गालातल्या गालात हसला.

त्याकाळी केशव सेन यांना समाजात मोठा मान होता. त्यांच्या भक्तीची, उदारतेची, इतर अनेक गुणांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. उत्कृष्ट प्रभावी वक्ते म्हणून ते भारतातच नव्हे तर इंग्लंड, अमेरिकेतही प्रसिद्ध होते.

असेच एकदा सगळे भक्त रामकृष्णांच्या समोर बसले असता नरेंद्रांच्या संबंधात रामकृष्ण म्हणाले, ''ज्या एका शक्तीच्या प्रकटीकरणामुळे केशव जगात प्रसिद्ध झाला आहे, तसल्या अठरा शक्ती नरेंद्रामध्ये पूर्ण प्रमाणात आहेत. केशव आणि विजय यांच्या अंतरात जणू दिवा तेवत

आहे, तर नरेंद्राच्या ठिकाणी प्रत्यक्ष ज्ञानाचा सूर्यच तेजाळत आहे. भाषा आणि मोहाचा लवलेशसुद्धा त्याच्या ठायी नाही.''

खरंतर अशी स्वतःची स्तुती ऐकून एखादा सामान्य माणूस हुरळूनच गेला असता. पण प्रत्येक गोष्ट पारखून, तपासून घेण्याची सवय नरेंद्राला लागली होती. त्यांनी ती स्तुती तपासून पाहिली तेव्हा त्यांना कळाले की, केशव सेन केवढा मोटा माणूस आणि मी तर एवढासा कॉलेज शिकणारा पोर,

लगेच रामकृष्णांना नम्रतेनं अडवीत नरेंद्र म्हणाला, ''महाराज, आपण हे असं काय बोलता ? आपलं असलं बोलणं ऐकून लोक आपल्याला नक्कीच पागल समजतील. कुठं जगप्रसिद्ध केशवसेन आणि महात्मा विजयकृष्ण गोस्वामी आणि कुठं माझ्यासारखा, अतिशय सामान्य, अगदी नगण्य असलेला तरुण ! त्यांच्याशी अशी माझी तुलना करून आपण असं पुढं काही बोलू नका.''

मोठ्या स्तुतीचा नरेंद्रावर परिणाम झाला नाही, हे पाहून आनंदाने रामकृष्ण म्हणाले, ''काय करू रे, जगदंबा मातेने मला तसे दाखविले. त्या मातेने मला कधीच खोटे दाखविले नाही. खरे तेच दाखविले, म्हणूनच मी तसे म्हणालो.''


❖ ❖ ❖

## नरेंद्रचा कठीण काळ

इ. स. १८८४. नरेंद्रच्या बी. ए. परीक्षेचा निकाल अजून लागायचा होता. एवढ्यात नरेंद्रला त्याचे वडील वारले असल्याचा निरोप आला. तो कलकत्त्याला घरी आला. सारे कुटुंब दुःखसागरात बुडून गेले होते. कुटुंबाची जबाबदारी आता नरेंद्रवर पडली होती. कारण विश्वनाथ दत्त यांनी आपल्या उदारपणामुळे भविष्याची तरतूद केली नव्हती. कुटुंबावर कर्जच होते. देणेकरी वसुलीसाठी मागे लागले. मग वडिलांच्या मृत्यूचे सुतक फिटण्याआधीच नरेंद्रला नोकरीच्या शोधात बाहेर पडावे लागले. दिवसभर अनवाणी भटकून ते रात्री थकूनभागून घरी परत येत असत. आई व भावंडांचे करुण चेहरे पाहून त्याचे आतडे तुटत असे. एकांतात तो रडत असे. कधीकधी स्वतः उपाशी राहून त्याला भटकावे लागे. त्यातच लोभी, लबाड नात्यातील व्यक्तीने घरासाठी दावा लावला. अर्थात वकिलीचा अभ्यास करणाऱ्या नरेंद्रने हा दावा जिंकला. या दाव्यात त्याने कोर्टात ज्या धीराने उत्तरे दिली, स्पष्टीकरणे दिली त्यामुळे त्याच्याच वकिलांनी नव्हे तर विरोधी वकील व जज्जसाहेबांनीही त्याचे कौतुक केले व तो पुढे अतिउत्तम वकील होईल, असा आशीर्वाद व्यक्त केला.

शेवटी काहीच उपयोग होत नाही, असे पाहून ते दक्षिणेश्वरी रामकृष्णांकडे आले.

त्यांनी कुटुंबाची पोटापाण्याची तरी व्यवस्था करा,म्हणून रामकृष्णांना विनविले.



कालिमातेने नरेंद्रला दर्शन दिले.

पण नरेंद्राचा अजून निराकार वाद पूर्ण गेला नव्हता. सगुण भक्तीवर, उपासनेवर त्यांचा विश्वास नव्हता.

ठाकूर म्हणाले, ''मी आईला सांगितले, पण तू माझे ऐकत नाहीस म्हणून तुझ्याबद्दलचे आई ऐकत नाही. तूच समक्ष जाऊन सांग.'' नरेंद्रला रामकृष्णांबद्दल विश्वास होता. अपार श्रद्धा होती. ते कोणतीही गोष्ट उगाच सांगणार नाहीत याची खात्री झाली होती; शिवाय परिस्थितीसुद्धा तशीच होती.

शेवटी नरेंद्र कालीमातेच्या मंदिरात गेला. मातेने त्याला दर्शन दिले. काय हवे म्हणून विचारले. नरेंद्र म्हणाला, ''ज्ञान दे, भक्ती दे, वैराग्य दे !'' नरेंद्र घरी परतला. मागायचे ते न मागताच परतला. लागोपाठ तीन दिवस असेच झाले. मातेसमोर नरेंद्र ऐहिक सुखाची मागणी करूच शकला नाही.

कारण संसारसुख आणि आप्तस्वकीयांच्या मोहपाशात रमण्यासाठी त्यांचा जन्म नव्हताच मुळी. पण त्याच्या जीवनाचा विकास होण्यासाठी जगातील सुख-दुःखे त्यांना कळणे आवश्यक होते. या घटनांमधूनच रंजल्या – गांजलेल्यांचे कैवारी असे स्वामी विवेकानंद घडत होते.

श्रीरामकृष्ण एकदा म्हटले होते, ''ज्या क्षणी नरेन दुःख-दैन्य यांच्या संपर्कात येईल त्या क्षणी त्याचा नश्वर दिसणारा अभिमान असीम करुणेत बदलून जाईल.''

रामकृष्णांचे हे शब्द अक्षरशः खरे झाले. दुःख-दैन्य, दारिद्र्याच्या ज्वाळांच्या चटक्यांनी नरेंद्रनाथांना विश्वप्रेमी विवेकानंद बनविले. त्या दुःखाच्या चटक्यांनीच ते दुःखी जनांचे कनवाळू-कैवारी बनले.

दक्षिणेश्वरी आल्यावर त्यांची पोटा-पाण्याची ददात मिटली. नरेंद्रांना थोडेबहुत काम मिळू लागले. थोडा काळ त्यांनी शिक्षकाचेही काम केले.

एके दिवशी रामकृष्ण आपल्या शिष्यांसमवेत बसले असता ते भावनावस्थेत गेले. त्याच अवस्थेत म्हणाले, ''जीवावर दया नाही, शिवज्ञानाने जीवांची सेवा.''

बाकी कोणाला काही उलगडा झाला नाही. नरेंद्र मात्र खुषीत बाहेर आले. म्हणाले, ''आज मला प्रकाश दिसला. आज जे ऐकले त्यामुळे वनातील वेदान्त घरी आणता येईल. मनुष्य रात्रंदिवस ज्याच्या सहवासात रहातो, ज्यांच्यावर प्रेम करतो, ज्यांच्यावर श्रद्धा ठेवतो, ज्यांचा सन्मान करतो ते सर्वच परमेश्वराचे अंश आहेत. प्रत्यक्ष परमेश्वर आहेत. ईश्वराने संधी दिली तर आज मी जे ऐकले त्याचा सर्व जगभर प्रसार करीन. पंडित मूर्ख, धनी-दरिद्री ब्राह्मणाला चांडाळ या साऱ्यांनाच ते ऐकवून मोहित करीन.''

'शिवभावे जीव सेवा' या महामंत्रात मोठी शक्ती दडलेली आहे. त्यात मानव जातीच्या मुक्तीचे बीज दडले आहे. समता, मैत्री, विश्वबंधुत्व यांचे अंकुर त्या मंत्रात दडले आहेत. स्पृश्य व अस्पृश्य यांच्यामध्ये, समाजातील जातीमध्ये, आपापसात भांडणाऱ्या धर्मामध्ये किंवा एकाच धर्मातील पंथांमध्ये एकता आणण्याचा उत्तम उपाय म्हणजे मानवाची सेवा. मानवातच परमेश्वर असतो; म्हणून मानवसेवा हीच परमेश्वराची श्रेष्ठतम पूजा होय.

म्हणूनच स्वामी विवेकानंदांनी भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात भ्रमण करून मानवजातीचे चिरकल्याण करणाऱ्या या पवित्र अशा मंत्राचा प्रचार केला. प्रसार केला.


❖ ❖ ❖

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय [illegible]
बाल वाङ्मय विभाग.
क्र. २९४८ दि. 3/3/९८
विषय बा. वा. र. . . .

# नरेंद्रांचे विवेकानंद झाले !

इ. स. १८८५ मध्ये रामकृष्ण आजारी पडले. त्यांना घशाचा त्रास होऊ लागला. बोलणेच काय पण खाणेपिणेही अशक्य होऊ लागले. त्यांच्या उपचारासाठी त्यांना कलकत्त्यात ठेवायचा निर्णय घेण्यात आला. पण भर शहरात रहाणे कठीण वाटल्याने काशीपूर येथे ठेवण्यात आले.

तेथे उद्यान असलेला बंगलाच घेण्यात आला. तेथे नुसते शुश्रूषा गृह न होता, अध्ययन मंदिरही झाले. रामकृष्णांची सेवा करण्यासाठी विवेकानंदांनी नोकरी सोडली व ते इथेच येऊन राहिले. रात्रंदिवस आपल्या प्रिय ठाकूरांची सेवा करू लागले.



'नरेंद्र यापुढे लोकशिक्षणाचे काम करील.' रामकृष्णांनी सांगितले.

ही जागा रामकृष्ण संघाच्या इतिहासात ईश्वरोपासना, गुरूदेव, तपसेवा, संघनिर्मिती या दृष्टीने चिरस्मरणीय ठरली.

याच ठिकाणी रामकृष्णांनी आपल्या तरुण शिष्यांना एकत्र केले. त्या तरुण मित्रांना दीक्षा दिली. भगवी वस्त्रे व जपमाळ दिली. त्यांच्यात आध्यात्मिक शक्ती संचारित केली. त्यांना संन्यास दीक्षा दिली. नरेंद्रला तर समाधी अवस्थेत आपली सर्व शक्ती - सर्वस्वच प्रदान केलं.

आपल्या आजारपणाच्या निमित्ताने रामकृष्णांनी सर्व शिष्यांना एकत्र केले. निरवानिरवीचे बोलणे केले. नरेंद्रला त्यांचा नेता केले. तोच तुम्हाला पुढे सर्व शिकवील असे सांगितले. एका कागदावर लिहून त्यांनी सांगितले. ''नरेंद्रच पुढे लोकशिक्षणाचे काम करील.''

रामकृष्णांनी सोळा तरुण मित्रांना यागमंत्राने दीक्षा दिली. या सर्वांनीच पुढे संन्यास घेतला. नरेंद्राने हे सारे मायापाश तोडले. घर सोडले. बाहेर पडला. संन्यास घेतला. संन्याशी पूर्वीचे सारेच सोडून देतात. घर सोडतात, नाती सोडतात, मोह-माया सोडून देतात. सुख-दुःखाचा त्याग करतात. आहारनिद्रेच्या बाबतही उदास होतात. ब्रह्मचर्य पाळतात.

याचनुसार नरेंद्र तर पहिल्यापासून ब्रह्मचर्य पाळत होता. कठोर तपस्येमधून, रामकृष्णांच्या मार्गदर्शनामधून, त्यांच्या कठोर परीक्षेस सामोरे जाऊन घडत होता. संन्याशी जीवनास आवश्यक अशा गोष्टी प्राप्त करीत होता. त्यावर प्रभुत्व मिळवीत होता. त्याने आपले नरेंद्र नाव सोडले. आता त्याने विवेकानंद हे नवे नाव धारण केले. जगाला मार्गदर्शन करणारा, प्रकाशाकडे नेणारा, कल्याणाप्रत घेऊन जाणारा विवेकानंद असा घडत गेला.

❖ ❖ ❖

## वराहनगरात साधना

१६ ऑगस्ट १८८३ रोजी पहाटे १ वाजून ६ मिनिटांनी श्रावणी पौर्णिमेच्या दिवशी 'काली' हे मातेचे नाव तीन वेळा उच्चारून श्रीरामकृष्णांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांनी डोळे मिटून जी समाधी लावली तीच महासमाधीत विलीन झाली. ते आत्मस्वरूपात विलीन झाले.

श्रीरामकृष्णांच्या महासमाधीनंतर काशी-पूरचे उद्यानगृह सोडणे आवश्यक होते. मग हे जमा झालेले बालसंन्याशी जाणार कुठे ? नरेंद्रांनी पाहिलं, की हे सर्व विखुरले जातील. शक्ती विखुरली जाईल. मग देवमाणसाचे कार्य तेवढ्यावरच थांबेल. गुरुदेवांनी दिलेल्या साधना, आदर्श एकत्र केंद्रित व्हाव्यात, हे संन्याशी अगदी निराश्रितांसारखे भटकता कामा नये. असे विवेकानंदांना वाटले. मग त्यांनी 'गुरू बंधू' सुरेंद्रनाथ आणि तारकनाथ यांच्या मदतीने

वराहनगर येथे घर भाड्याने घेतले व गुरुदेवांच्या अस्थिकलशासह काशीपूरच्या उद्यानगृहाचा निरोप घेतला.

हे घर म्हणजे एक पडकी इमारत होती. भुतांचे घर म्हणून लोक त्याला संबोधीत. रामकृष्णांचा अस्थिकलश तेथे ठेवण्यात आला. सारे भक्त तेथे राहू लागले. रोज पूजा-पाठ, ध्यान-धारणा, भजन-कीर्तन, धर्मशास्त्राचे अध्ययन येथे सुरू झाले. बाहेरचे भक्तही तेथे येऊ-जाऊ लागले. येथेच रामकृष्ण संघाची स्थापना झाली.

१८८७ मध्ये नरेंद्रनाथ व इतर शिष्यांनी जानेवारी महिन्यात विरजा होम केला. सर्वांनी विधीपूर्वक संन्यास ग्रहण केला. या सर्वांचे येथील जीवन त्याग, तपस्या, खडतर व्रतांनी भरलेले होते. चांगल्या शिकल्यासवरल्या या तरुणांनी आपापल्या घरादारांचा, नातेवाइकांचा, पैशा-अडक्याचा, सर्व सांसारिक सुखांचा त्याग केला होता.

सारा दिवस खडतर तपस्येत जाई. कधी कधी खायलाही मिळत नसे; कधी अपुरेच असे. पण कोणाचेच तिकडे लक्ष नसे. सर्वजण जप-तप-ध्यान याच गोष्टींत मग्न असायचे. इ. स. १८८६ पासून १८९२ पर्यंत ह्या भुतांचा वाडा आता तपोभूमीमध्ये बदलून गेला. ते एक पवित्र स्थान बनून गेले.

याच काळात स्वामी वैद्यनाथ भ्रमंतीला बाहेर पडले व परत वराहनगर येथे आले. १८८८ मध्ये परत गेले. १८९० मध्ये ते परत हिमालयात भ्रमंतीसाठी गेले. यावेळी त्यांच्या सोबत काही गुरुबंधू होते. नंतर त्यांनी मला निःसंग रहायचे आहे, असे सांगून गुरुबंधूंची साथ सोडली.

❖ ❖ ❖

## विवेकानंदांची भारत - भ्रमंती

काही दिवस वराहनगर मठात घालविल्यानंतर तरुण संन्याशांच्या मनात तीर्थपर्यटनाची प्रबळ इच्छा उत्पन्न झाली. त्यांच्यातील एकजण 'सारदा' विवेकानंदांना न सांगताच गुपचूप मठ सोडून गेला.

मग नरेंद्रांनी आपल्याशी विचार केला, सर्वांनाच मनातून तीर्थाटनास जाण्याचा विचार आहे. यामुळे मठ [illegible] होईल. या सर्वांनी माझ्याच आदेशानुसार वागावे, असा मी कोण आहे ? हे मधुर बंधन, मायापाश मला तोडून टाकलेच पाहिजेत. म्हणून त्यांनीही मठ सोडून जाण्याचा दृढ संकल्प केला.

मग एक दिवस त्यांनी सर्व गुरूबंधूंचा निरोप घेतला. श्रीगुरूंच्या महान इच्छेने संचलित होऊन परिव्राजकाच्या भ्रमणशील संन्याशाच्या वेशात ते वराहनगर मठातून बाहेर पडले.

१८८९ साली तीर्थयात्रेच्या निर्धाराने ते बाहेर पडले व ७ वर्षे सर्वत्र भ्रमण करून परत मठात आले. अर्थात त्यावेळी मठ वराहनगरातून दुसरीकडे हलविला होता.



विवेकानंद भारत भ्रमणाला निघाले.

भ्रमणाला निघण्यापूर्वी गुरुमाता शारदा देवींचा आशीर्वाद घेण्यासाठी ते घुबुडी नावाच्या खेड्यात गेले. तेथे माताजींना वंदन करून ते म्हणाले, ''जोपर्यंत श्रीगुरूंचे कार्य पूर्ण करू शकणार नाही तोपर्यंत मी परत येणार नाही. माझा संकल्प सिद्धीस जाईल असा आशीर्वाद द्या.''

गुरूमातेचा आशीर्वाद घेऊन निघाल्या-नंतर पहिल्या साडेतीन वर्षांत पूर्वेकडील कलकत्त्यापासून पश्चिमेस मुंबईपर्यंत व उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत भ्रमण केले.

बंगालमधील दुथडी भरून वहाणाऱ्या नद्या, आनंदाने डोलणारी भात व तागाची शेती पाहिली. हिमालयातील थंडीचा कडाका पचविला. राजस्थानचे अंग जाळणारे रुक्ष वाळवंट पाहिले. दक्षिणेकडचा उकाडा अनुभवला. दीन-दुःखी-दलितांचा आर्तनाद त्यांनी ऐकला, पोषक पाहिले, पोषित पाहिले, ते जेथे जेथे गेले तेथे तेथे नरनारायणसेवेचा संदेश दिला. या प्रवासात त्यांना खूप शिकायला मिळाले. पहायला मिळाले. अनुभवायला मिळाले. याच भ्रमंतीत त्यांची टागोरांशी भेट झाली होती. लो. टिळकांशी भेट झाली.

जवळ काही न ठेवता ईश्वरावर भार टाकून व हातात दंड, कमंडलू घेऊन परिव्राजक वेशात ते भारतभर फिरत राहिले. ते अबू पर्वतावर जैन मंदिर भागात गेले. तेथे खेत्रीच्या महाराजांचा परिचय झाला.

महाराजांनी केलेला आग्रह मोडून ते गुजराथेत अहमदाबाद, लिमडी, जुनागड, गिरनार, भुज, वेरावळ, पाटण, सोमनाथ व पुढे पोरबंदर (सुदामपुरी) येथे पोहोचले.

पोरबंदरच्या महाराजांशी घनिष्ट परिचय झाला. त्यांच्या महालात आठ-नऊ महिने राहून वेदांचा अनुवाद करणारे दरबारी पंडित शंकर पांडुरंग यांना अनुवादाच्या कामात मदत केली. त्यांच्याच जवळ पातंजल भाष्याचे अध्ययन केले.


शंकर पांडुरंगांनी स्वामीजींची विद्वत्ता पाहून परदेशी जाण्याचा सल्ला दिला. पोरबंदरहून स्वामीजी द्वारका, [illegible]

आशापुरी, पलिताना येथील शत्रुंजय पर्वत व मग बडोद्याहून खांडव्यास आले.

शिकागो येथे धर्मपरिषद होणार असल्याचे त्यांनी खांडवा येथेच ऐकले व तेथे जाण्याची त्यांच्या मनात इच्छा उत्पन्न झाली.

खांडव्याहून स्वामीजी मुंबईला व तेथून पुण्याला आले. मुंबई-पुणे प्रवासातच त्यांची लो. टिळकांशी भेट व ओळख झाली. टिळकांनी त्यांना प्रेमाने आपल्या घरी नेले. तेथे स्वामीजी एक महिना राहिले. स्वामीजींचे देशप्रेम, त्यांच्या मनातील दीनदुबळ्या दुःखितांबद्दलची सहानुभूती, करुणा यांचा टिळकांच्या मनावर खूप खोल परिणाम झाला.

महाबळेश्वर, कोल्हापूर, बेळगाववरून म्हैसूरच्या महाराजांशी स्वामीजींचा संबंध आला. महाराज त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झाले व स्वामीजींवर त्यांची गुरूप्रमाणे श्रद्धा बसली. महाराजांनी दिलेले सर्व दान नाकारले. तेथील



विवेकानंदांना नवा प्रकाश दिसला !

पंडितांच्या सभेत वेदान्तावर हृदयस्पर्शी भाषण केले. पुढे ते कोचीन, त्रिवेंद्रम् मार्गाने रामेश्वरला आले. तेथून ते कन्याकुमारी येथे आले.

कन्याकुमारी देवीला साष्टांग नमस्कार करून ते म्हणाले, ''माते, मला मुक्ती नको. तुझी सेवा हेच माझे व्रत.'' नंतर समुद्र संगमात उडी टाकून ते पोहत पोहत एका मोठ्या खडकावर गेले व तेथे ध्यानस्थ बसले. तेथे त्यांना नवा प्रकाश दिसला. मार्गदर्शन घडले. रामकृष्णांची हाक त्यांच्या अंतर्मनात जणू निनादून उठली. याच खडकावर त्यांनी परदेशात धर्मपरिषदेला जाण्याचा संकल्प केला. ही अपूर्ण घटना ज्या खडकावर घडली त्याच कन्याकुमारीच्या खडकावर आज स्वामी विवेकानंद स्मारक उभे आहे.

या भ्रमंतीत स्वामीजींनी दुःखदारिद्र्य अनुभवलं. गरीबांचा छळ, शोषण पाहिलं, धर्माची अवनती पाहिली. संकुचित वर्तुळात अडकलेला वैदिक धर्म पाहिला. गुलामी, अन्याय, स्पृश्यास्पृश्यता पाहिली.

आमचा संकुचित दृष्टिकोन, कर्मक्षेत्राचा संकुचितपणा, एक दुसऱ्याशी तुटलेला संपर्क पाहिला. बौद्ध धर्मापासून बचाव करण्यासाठी हिंदूधर्माला तसे करावे लागले होते.

❖ ❖ ❖

## स्वामीजींचे परदेशगमन

कन्याकुमारीहून स्वामीजी मद्रासला आले. त्यांच्या वाणीने सर्वजण मोहून गेले. हिंदू धर्मप्रतिनिधी म्हणून स्वामीजींना शिकागो येथे पाठविण्याचा मद्रास येथील प्रमुख नागरिकांनी निर्णय घेतला. उत्साहाने तरुण पुढे आले. पैसे गोळा करण्यास त्यांनी सुरुवात केली. खेतरीच्या महाराजांनीही त्यासाठी बरीच मदत केली.

स्वामीजी मग मुंबईला आले आणि पी अँड ओ कंपनीच्या 'पेनिन शुलर' बोटीने शिकागोस जाण्यासाठी निघाले. ३१ मे १८९३ रोजी बोटीने मुंबई बंदर सोडले. स्वामीजींचे गुरुबंधू, चाहते, शिष्य सर्वांच्या डोळ्यांत पाणी आले. स्वामीजींचा ऊर भरून आला. गळा दाटून आला. भारताचा किनारा दृष्टीआड होईपर्यंत ते डेकवर उभे राहून त्यांच्याकडे पहात होते.

स्वामीजींनी जहाजातील इतर प्रवाशांशी ओळख करून घेतली. बोटीच्या कप्तानाशी गट्टी जमविली. जहाजावरील त्यांच्या दृष्टीने नवीनच असे खाद्यपदार्थ, युरोपियन आचार, व्यवहार यांच्याशी ते हळूहळू मिळतेजुळते घेऊ लागले. वाटेत जहाज जिथे जिथे थांबे तिथे स्वामीजी उतरून तेवढ्या वेळात तो भाग पाहून येत असत.

सिलोन, पेनांग, सिंगापूर, हाँगकाँग, कँटन, नागासाकी, ओसाका, किमाटो, याकोहामा असा प्रवास करीत करीत स्वामीजी १५ जुलै रोजी कॅनडाच्या व्हँकूव्हर बंदरात आले. तेथून ते आगगाडीने १८ जुलै रोजी शिकागो शहरात आले.

शिकागो शहरात सारेच अनोळखी. शहराला स्वामीजीनी व स्वामीजींना शहर अनोळखी. शिवाय रस्त्यावरून जाणारा भगव्या वस्त्रातील संन्याशी हा कुतुहलाचा विषय झाला होता. तरुण पोरांची टोळकी त्यांची टिंगल करीत, त्यांच्या मागोमाग हिंडत होती. तिथला प्रत्येक जणच त्यांना ठकवू पहात होता. शेवटी एका हॉटेलात त्यांनी मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी त्यांनी शिकागो येथील प्रसिद्ध असलेले जागतिक प्रदर्शन पाहून घेतले आणि भारतातील मंद, शीर्ण, क्षीण जीवनप्रवाहाची पाश्चात्यांच्या वेगवान उन्नत्तशील जीवनप्रवाहाशी तुलना करीत ते आपल्या मुक्कामी सायंकाळी परत आले.

पण तिथे खर्च खूप होत होता. तेथील लोक पाण्यासारखा पैसा खर्च करीत होते; यामुळे स्वामीजी फार मोठ्या चिंतेत पडले.

❖ ❖ ❖

# शिकागोतील अडचणी

शिकागोमध्ये एक दिवस त्यांना कळाले, की सर्व धर्मपरिषद सप्टेंबर महिन्याच्या आधी सुरू व्हायची नाही. शिवाय परिषदेच्या नियमानुसार जे लोक परिचयपत्र घेऊन आले असतील त्यांनाच प्रतिनिधी म्हणून निवडले जाणार होते. प्रतिनिधी म्हणून या सर्वधर्म-परिषदेत भाग घेण्यासाठी विनंतीपत्र भरून देण्याची तारीख तर कधीच उलटून गेली होती. यामुळेच या धर्मपरिषदेतील सहभागाची आशा स्वामीजींना राहिली नाही.

भारतातून निघताना त्यांच्याजवळ थोडाच पैसा होता. तो पंधरा दिवसांत संपला. ते विचलित झाले. फाजील आशावादी आणि पोरकट तरुणांच्या नादाने इथे आपण उगीच आलो, असे त्यांना वाटले. शेवटी मोघम आशा मनात धरून ते बोस्टनला निघाले.

या प्रवासात त्यांचा पोशाख पाहून कुतुहलाने एका महिलेने ते कोण, कुठून, आले, कशासाठी आले याची चौकशी केली. अमेरिकेत ते वेदान्त प्रचारासाठी आले आहेत, हे कळल्यावर तिने स्वामीजींना पाहुणे म्हणून आपल्या घरी नेले. तिथे ते निश्चिंत राहिले व मनात योजना केली की, प्रयत्न करूनही इथे वेदान्तप्रचाराचे कार्य चालू शकले नाही तर इंग्लंडला जायचे व तेथेही जमले नाही तर मग आपल्या मायभूमीत परत जाऊन आपल्या गुरुजींच्या दुसऱ्या आदेशाची वाट पहायची.

मग तेथील ओळखीच्या माणसांनी त्यांना पोषाखात बदल करणे भागच पाडले. मग त्यांनी नेहमीसाठी काळा कोट शिवला व आपली जुनी वस्त्रे फक्त व्याख्याने देण्यासाठी घालायला म्हणून ठेवून दिली. याच महिलेच्या घरी हार्वर्ड विद्यापीठातील प्राध्यापक राईट यांची स्वामीजींशी भेट झाली. स्वामीजींच्या वेदांतप्रसाराचा उद्देश त्यांना कळाला तेव्हा शिकागोच्या धर्मपरिषदेत जाण्याचा सल्ला त्यांनी स्वामीजींना दिला. मग

स्वामीजींनी आपल्या विनंतीपत्र, परिचयपत्रा संबंधीच्या अडचणी मोकळेपणाने त्यांना सांगितल्या.

हे ऐकून प्रा. राईट म्हणाले, "स्वामीजी, आपल्याला परिचयपत्र मागणे म्हणजे, तुला प्रकाशण्याचा काय अधिकार आहे, असे प्रत्यक्ष सूर्यालाच विचारण्यासारखे आहे."

मग प्रा. राईट यांनी परिषदेशी संबंधित श्री. बॉनी यांना उद्देशून स्वामीजींच्या हाती एक पत्र दिले. त्यात त्यांनी लिहिले होते की, "आमच्या विद्यापीठातील साऱ्या विद्वान प्राध्यापकांची विद्वत्ता एकत्रित केली, तरी स्वामीजींच्या तुलनेत कमीच होईल."

स्वामीजी शिकागोत आले खरे, पण त्यांना दिलेला पत्ताचा ते हरवून बसले होते. आता शोध कसा घ्यायचा ? त्यांनी शोधण्याचा प्रयत्न केला. पण कोणीच सांगेना. पोटात भूक खूप लागली म्हणून त्यांनी भिक्षा मागण्याचा निश्चय केला. पण भारतासारखी भिक्षा तेथे कोण देणार?

शेवटी एका बंगल्यामागच्या गोडावूनमध्ये भुकेच्या पोटी, थंडीने कुडकुडत त्यांनी रात्र काढली. सकाळी त्या घरातील महिलेने घराचे मागचे दार उघडले. तिने स्वामीजींना पाहिले. ती स्वामीजींच्या जवळ गेली व "आपण सर्व धर्मपरिषदेसाठी आलात काय?" अशी चौकशी केली.

मग स्वामीजींनी आपली सर्व अवस्था त्या महिलेस सांगितली व बॉनी साहेबांचा पत्ता हरवल्याचे सांगितले. तिने स्वामीजींना घरात बोलावून नेले, खाण्यास दिले व धर्मपरिषदेच्या जागी घेऊन जाण्याचे आश्वासन दिले. या महिलेचे नाव होते, श्रीमती जॉर्ज डब्ल्यू हेल. पुढे तिने स्वामीजींच्या प्रचारकार्यात फारच मदत केली.

थोडी विश्रांती घेऊन स्वामीजी श्रीमती हेल यांच्याबरोबर धर्मपरिषदेच्या स्थानी गेले. हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून तेथे त्यांचा स्वीकार करण्यात आला. प्रतिनिधींसाठी असलेल्या निवासस्थानात ते राहू लागले.


परिषद सुरू होण्याच्या दिवशी सकाळी सर्व प्रतिनिधी 'आर्ट पॅलेस' भवनात एकत्र झाले. तेथील सभागृहात सर्वांना समोर व्यासपीठावर बसविण्यात आले. एकेका प्रतिनिधींनी पुढे येऊन आपापल्या धर्माच्या श्रेष्ठतेविषयी भाषणे केली व मग स्वामीजींनी सोमवार तारीख ११ सप्टेंबर १८९३ रोजी आपल्या भाषणातील पहिल्या फक्त चारच शब्दांनी सर्व धर्मपरिषद जिंकली. ते शब्द होते - "अमेरिकेतील माझ्या भगिनींनो व बंधूंनो !"

❖ ❖ ❖

# सर्वधर्म परिषदेनंतर

सर्वधर्म परिषदेत १७ दिवसांत त्यांनी वेगवेगळ्या १२ विषयांवर दिलेली व्याख्याने अत्यंत प्रभावी ठरली. यानंतर त्यांना अमेरिकेत अनेक ठिकाणी व्याख्यानासाठी बोलावण्यात येऊ लागले. अविश्रांतपणे त्यांनी अमेरिकेत वेदांताचा प्रचार केला. तेथे त्यांना अनेक परदेशी शिष्य मिळाले.

३१ मे १८९३ रोजी पश्चिम देशाच्या यात्रेला गेलेले स्वामीजी १५ जाने. १८९७ रोजी कोलंबोत आले. तेथे त्यांनी श्रीलंकेच्या वेगवेगळ्या गावांना भेटी दिल्या. व्याख्याने दिली. नंतर ते मद्रासला आले. भारतात सर्वत्रच त्यांचे शानदार स्वागत झाले. मद्रासमध्ये नऊ दिवस राहून त्यांनी व्याख्याने दिली. नंतर ते



कलकत्त्याला गेले. तेथे नागरिकांनी त्यांना मानपत्र दिले.

मग त्यांनी रामकृष्णांच्या सर्व शिष्यांना एकत्र केले. 'रामकृष्णमिशन' ची स्थापना केली. यानंतर त्यांनी उत्तर भारताचा दौरा केला. काश्मीरला गेले, अमरनाथची यात्रा केली. लाहोरला जाऊन वेदांत प्रचार केला.

रामकृष्ण मठासाठी त्यांनी जमीन मिळविली. गंगेच्या काठी बेलूर गावी या जमिनीवर त्यांनी श्रीरामकृष्णांचे मंदिर उभारले. तेथे रामकृष्णांच्या अस्थिकलशाची स्थापना केली. कलकत्त्याच्या प्लेग साथीत संन्याशांना घेऊन सेवाकार्य केले.

सततच्या व्याख्यानांनी, धावपळीने ते आजारी पडले. शिष्य, मित्र व डॉक्टरांच्या आग्रहाखातर औषधपाण्यासाठी पुन्हा अमेरिकेत जाण्याचे त्यांनी ठरविले.

२० जून १८९९ रोजी स्वामीजी 'गोवळकोंडा' बोटीने ते यावेळी जपानमार्गे न जाता आफ्रिका, युरोपमार्गे केले. वाटेत लंडन येथे दोन आठवडे थांबून अमेरिकेकडे गेले. यावेळी स्वामीजींनी अमेरिकेतील कॅलिफोर्निया प्रांतात खूप कार्य केले.

तेथे एकदा काही मुले बंदुकीतून नेम धरून मारायचा सराव करीत होती, पण कोणालाच ते जमत नव्हते. स्वामीजी तिथे होते. त्यांच्या डोळ्यांत मिश्किल भाव पाहून एक मुलगा म्हणाला, "तुम्ही मारून दाखवाल?"

स्वामीजी म्हणाले, "पाहू प्रयत्न करून!" त्यांनी नेम धरला. अचूक लागला. मग ते म्हणाले, "जे काही कराल ते मन पूर्ण एकाग्र करून करा म्हणजे मग तुम्ही चुकणार नाही."

मि. बुक यांनी दिलेल्या १६० एकर जमिनीवर त्यांनी 'शांतिमठा'ची स्थापना केली. अमेरिकेत सुरुवातीस त्यांची प्रकृती सुधारत होती, पण अतिश्रमाने ती पुन्हा ढासळली. अमेरिकेत कार्य चालू ठेवण्यासाठी स्वामी तुरीयानंदांना तेथे ठेवून २० जुलै १९०० रोजी स्वामीजी पॅरिसला गेले.

पॅरिसमध्ये तीन महिने राहून ते २४-१०-१९०१ ला हंगेरी, सर्बिया, रूमानिया, बल्जेरिया इ. देशांतून प्रवास करीत दि. २८ रोजी कॉन्टनटिनोपाल येथे पोहोचले. मग तेथून त्यांनी ग्रीस, इजिप्त देशांना भेट दिली.

मग भारताकडे परतायची तीव्र ओढ लागल्याने ९ डिसेंबर रोजी रात्री बेलूर मठात हजर झाले. थोड्याच दिवसांत ते हिमालयातील मायावती येथे गेले. तेथे त्यांनी 'अद्वैत आश्रमा'ची स्थापना केली.

मायावतीहून परतल्यावर भावी कार्याच्या योजना त्यांनी आखल्यानंतर पुन्हा झंझावती दौरा आरंभला. त्यांनी बंगालचा दौरा केला. ढाक्का, शिलाँग येथे व्याख्याने देऊन ते परत बेलूर मठात परतले. नंतर जपानमध्ये येण्याचे निमंत्रण घेऊन आलेले जपानी विद्वान ओकाकुरा यांच्याबरोबर बुद्ध गयेस गेले.

बनारसमधील धर्मपंडितांच्या आग्रहा- वरून त्यांनी ४ जुलै रोजी काशीमध्ये 'श्रीरामकृष्ण अद्वैत आश्रमा'ची स्थापना केली. पुढे एका खोलीत सुरू झालेली ही संस्था 'रामकृष्ण मिशन सेवाश्रम' म्हणून प्रसिद्ध झाली. तेथे त्यांची प्रकृती सुधारली, पण इतर अनेक कारणांनी

त्यांना बेलूरला यावे लागले.

मठात पूजाअर्चा, भजन, धर्मोपदेश यांत वेळ जात होता. आजारी असूनही त्यांचे कार्य चालूच होते. ते म्हणत, 'काली' मला स्वस्थ बसू देत नाही."

यानंतर त्यांचे दौरे थांबले. धावपळ थांबली. प्रकृती क्षीण होत होती.

४ जुलै १९०२ रोजी स्वामीजींची सारी दिनचर्या नेहमीप्रमाणे झाली. रात्री नऊ वाजता ते झोपण्यासाठी लवंडले. जपाची माळ तशीच हातात होती. माळ असलेला हात किंचित कापला. तोंडातून कण्हल्याचा सारखा अस्पष्ट आवाज निघाला. मस्तक कलंडून उशीवरून खाली घसरले. हिंदू धर्मातील या श्रेष्ठ योग्याला अनंत निद्रा लागली होती. रात्रीच्या काळोखात कालीमातेने आपले हात पसरून आपल्या थकल्या-भागल्या बालकाला आपल्या मांडीवर घेतले होते.

❖ ❖ ❖

म. सं. सं. अर्गे, [illegible]
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २९४८ दिनांक ३।३।९८
विषय बा.वा. क्र. ........

BVBK-0402948